प्रकरण २

# साधने

## ( Sources )

इतिहासलेखनामध्ये भूतकाळातील लिखित किंवा अलिखित विवरण उपलब्ध असलेल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भातील मानवी क्रिया आणि आंतरक्रिया यांच्या संरचनांचा आणि प्रक्रियांचा अभ्यास केला जातो. १९ व्या शतकानंतर असे मानले जाऊ लागले की, इतिहास हा सत्तास्थानी असलेल्या व्यक्ती, त्यांची कृत्ये किंवा युद्धे यांच्याशी संबंधित नसून त्यामध्ये सामान्य व्यक्ती, त्यांचे जीवन यांचाही समावेश झाला पाहिजे. मार्क्सच्या मते, ''जीवनातील भौतिक उत्पादनाच्या पद्धती आणि त्यांच्याशी निगडित असलेल्या सामाजिक आंतरक्रिया यामुळे सामाजिक आकृतिबंधाचे विविध टप्पे ठरतात आणि त्यातून समाजाचा इतिहास घडतो.''

लिंगभेदविषयक अभ्यास (Gender Studies) करण्यासाठी सामाजिक इतिहास हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. जगातील सर्व समाजातील स्त्रियांनी सर्व टप्प्यांत इतिहास घडविण्यात स्वतःचे योगदान दिले आहे. परंतु इतिहासलेखनात एकतर त्या अदृश्यमान राहिल्या आहेत किंवा त्यांना कमी महत्त्व मिळाले आहे. कधी-कधी त्यांना शूरत्व दिले गेले आहे तर कधी-कधी सामान्य जनता म्हणून पूर्णपणे दुर्लक्षित ठेवले आहे. त्यामुळेच इतिहासातील त्यांच्या जाणिवांचे धागे-दोरे समजावून घेऊन इतिहासाचे पुनर्लेखन करण्याची गरज निर्माण झाली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इतिहासलेखनाचे अनेक प्रयत्न झाले. शासकीय प्रोत्साहनामुळे राष्ट्रीय चळवळ हा संशोधनाचा लोकप्रिय विषय बनला. वसाहतवाद व त्याविरोधी लिखाण तसेच राजकीय, सामाजिक, आर्थिक इतिहास यामध्ये मोठा टप्पा गाठला गेला.

१९५० व १९६० च्या दशकात 'सामाजिक रचना' याकडे शैक्षणिक विद्याशाखांचे लक्ष गेले. कारण डाव्या विचारसरणीचा त्यावर प्रभाव होता. तरीही आधुनिक भारतीय इतिहासलेखनामध्ये राष्ट्रवादी सांप्रदायाचे वर्चस्व चालू राहिले. त्यामुळेच सामाजिक इतिहासलेखनाचे दुय्यमीकरण झाले. अपवादात्मक लिखाण वगळता १९७५ पर्यंत स्त्रीवादी दृष्टीने फारसे इतिहासलेखन झाले नाही. १९७० व १९८० च्या दशकात

स्त्रियांची चळवळ, स्त्रीविषयक अभ्यास आणि सबाल्टन स्टडिज यांना गती मिळाली. भारतामध्ये १९७० च्या दशकात स्त्रीवादी चळवळीच्या दुसऱ्या लाटेचा उदय झाल्यावर ज्ञान व विज्ञाननिर्मिती याबद्दल अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले. ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेत स्त्रियांना नेहमीच दुय्यमत्व दिले गेले आहे. हे स्त्रीविषयक अभ्यासातून पुढे येऊ लागले. १९७४ मध्ये 'समानतेकडे वाटचाल' हा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर सर्वच विद्याशाखा, त्यातील ज्ञान आणि संशोधन पद्धती यांची पुनर्रचना करण्याचे प्रयत्न सुरू झाले. स्त्रीवादी दृष्टिकोणातून भूतकाळाची फेररचना करण्याचा प्रयत्न सुरू झाला. स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे वापरले गेलेले मार्ग आणि त्याला झालेला विरोध या दोन्हींचा समावेश स्त्रीवादी इतिहासलेखनात होतो. या पार्श्वभूमीवर इतिहास या विद्याशाखेची स्त्रीवादी दृष्टिकोणातून पुनर्रचना करणे महत्त्वाचे ठरते.

स्त्रियांना वगळून लिहिलेल्या इतिहासावर स्त्रीवाद्यांनी दीर्घकाळ टीका केली आहे. परंतु स्त्रीवादी इतिहासलेखनशास्त्रात केवळ दुर्लक्षित स्त्रियांना स्थान देणे एवढाच याचा अर्थ नाही तर त्या दुर्लक्षित का राहिल्या यासंबंधी विवेचन करणे अगत्याचे ठरते. स्त्रीवाद्यांच्या मते, 'स्त्रियांचा इतिहास लिहिण्यामध्ये फक्त भूतकाळातील स्त्रियांबद्दल नवीन माहिती देणे एवढेच नाही तर पुरुषी दृष्टिकोणातून लिहिल्या गेलेल्या इतिहासाच्या मर्यादा उघड करणे आणि नव्या स्पष्टीकरणाची मांडणी करणे यांचाही समावेश आहे. लिंगभाव दृष्टिकोणातून लिहिल्या गेलेल्या इतिहासात पूर्ण इतिहासलेखन शास्त्राचाच विचार केला जातो. स्त्री ही एका विशिष्ट चौकटीत बसवण्याची गोष्ट आहे ही कल्पनाच येथे नाकारली जाते.

वेद व संगारी (१९८९) यांच्या म्हणण्यानुसार ''या स्त्रीवादीलेखनातील स्त्रियांचा समावेश केवळ साधा असत नाही, हे लेखन विशिष्ट चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचे केवळ मूल्यमापन करीत नाही, तसेच स्त्रियांवरील जुलमांचा केवळ वृत्तांत नोंदवत नाहीत तर असे लिखाण इतिहास पुनर्निर्मितीच्या सर्व प्रयत्नांना मुळातूनच लपेटून घेणारे प्रश्न विचारते. वास्तव जीवनाच्या सर्व अंगात लिंगभेद आहेत हे मान्य केले जाते. वंश, धर्म, वर्ग, जात, राष्ट्र यानुसार लिंगभेदाचा प्रत्येक अनुभव बदलत असतो हे येथे दिसून येते.''

आधुनिक काळातील स्त्रियांची प्रगती व विकास लक्षात येण्यासाठी भारतीय स्त्रीविषयक ऐतिहासिक संदर्भ साधने समजावून घेणे आवश्यक आहे. प्राच्यविद्या (ओरिएंटल स्टडिज्) अभ्यासक प्राचीन काळातील माहिती घेण्यासाठी भारतीय विद्या (इंडॉलॉजी) या विषयाकडे वळतात. प्राचीन-मध्ययुगीन भारतीय संस्कृतीचा अभ्यास करताना साहित्य, शिल्पे, चित्रे, नाणी, शिलालेख, परदेशी प्रवाशांचे वृत्तांत,

उत्खननात आढळणारे अवशेष अशा अनेकविध गोष्टी तपासून पाहाव्या लागतात. भाषाविषयक अभ्यासक सर्व प्रकारचे प्राचीन साहित्य अभ्यासून त्यातून भारतीय संस्कृतीचे अन्वयार्थ शोधतात.

भारतातील प्राचीन साहित्य प्रामुख्याने पुढीलप्रमाणे : (१) वैदिक हिंदू अथवा ब्राह्मण परंपरेतील साहित्य संस्कृत भाषेतून आहे. तर (२) जैन प्राचीन साहित्य अर्धमागधी व शौरसेनी या प्राकृत भाषेतून व (३) बौद्ध प्राचीन साहित्य पाली भाषेतून मिळते. वेगवेगळ्या भाषेतील साहित्यातील या सर्व संदर्भ साधनातून भारतीय संस्कृतीची ओळख, वैशिष्ट्ये व मर्यादाही जाणवतात. भारतीय जीवन समजण्यासाठी त्यात आढळणाऱ्या स्त्रियांचा दर्जा व स्थान पाहणे म्हणजेच (१) पुरुषसत्ताक पद्धती (२) विवाह, त्यांचे प्रकार (३) चालीरीती, रूढी, परंपरा (४) चित्रकला-शिल्पकला (५) गायन (६) वादन (७) नृत्य (८) नाटके-साहित्य यांचा अभ्यास करणे होय.

उपरोक्त साधनांवरून समाजातील ललित-कलांच्या विकासाविषयी विधाने करता येतात. स्त्रियांचे दागिने, पोषाख सांपत्तिक स्थिती दर्शवितात. उपभोगाच्या साधनांवरून व्यापार, खनिजे, धातुशास्त्र, शिवणकला, भरतकाम यावरून तत्कालीन आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीचा अंदाज करता येतो. सण, वार, उत्सव, मेळे यावरून स्त्रीच्या सहभागाची कल्पना, सामाजिक सुरक्षितता, स्थिर शासनपद्धती यांचा अंदाज करता येतो. धार्मिक कृत्यातील स्त्रीच्या सहभागावरून त्यांना धर्म व तत्त्वचिंतनाच्या प्रवाहात स्वातंत्र्य व संधी कितपत होती याचे अवलोकन व त्यातून त्यांच्या धार्मिक व सामाजिक दर्जाविषयी अनुमान काढता येते.

स्त्रीविषयक संदर्भ साधनांचे दोन प्रकारांत विभाजन केले जाते. (१) पुराभिलेखीय साधने (२) अपुराभिलेखीय साधने.

**१. पुराभिलेखीय साधने :** पुराभिलेखीय साधनांमध्ये समकालीन लिखाण विश्वसनीय ठरते. म्हणूनच स्त्रीविषयक काही पुराभिलेखीय कागदपत्रे अव्वल (प्राथमिक) पुरावा म्हणून ग्राह्य मानली जातात. अशा साधनांमध्ये व्यक्तिगत संग्रह, मठ, मंदिरे, विहारांमधील संग्रह, सरकारी दरबारातील संग्रह, वेगवेगळ्या संस्थानांतील कागदपत्रे यांचा समावेश होतो. शासकीय कागदपत्रांमध्ये स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कागदपत्रांचा समावेश होतो. ब्रिटिश कालखंडात कागदपत्रांचे जतन करण्यासाठी कायदा झाल्याने तेव्हापासूनची व पूर्वीचीही कागदपत्रे दिल्ली, मद्रास, कलकत्ता येथील राष्ट्रीय पुराभिलेखागारातून व राज्यस्तरावरील मुंबई, जयपूर, हैद्राबाद इत्यादी प्रत्येक राज्याच्या राजधानीच्या शहरातील पुराभिलेखागारातून उपलब्ध होतात. भारतातील संस्थानिकांच्या पुराभिलेखागारातूनही अशी कागदपत्रे मिळतात. उदा. कोल्हापूर, सीतामऊ (मध्य प्रदेश), जनगणना अहवालातून १८७१ पासूनची प्रत्येक

१० वर्षांनंतरची स्त्रीविषयक सांख्यिकी माहिती उपलब्ध होते. प्रसिद्ध व्यक्तींच्या खाजगी कागदपत्रातून स्त्रियांच्या वैयक्तिक व समाजकार्याविषयी माहिती मिळते. उदा. म. गांधी, पंडित नेहरू व डॉ. बाबासाहेबांचे संकलित वाङ्मय तर 'स्पॅरो' मुंबई व 'आलोचना' पुणे यांसारख्या स्त्रीविषयक कागदपत्रांच्या संग्रहालयात अनेक स्त्रियांच्या खाजगी व सार्वजनिक जीवनविषयक कागदपत्रे संग्रहित केली आहेत.

**२. अपुराभिलेखीय साधने** : यांचे धार्मिक व अधार्मिक अशा दोन प्रकारांत विभाजन केले जाते. धार्मिक साधनांमध्ये प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन साहित्यातून स्त्रियांची माहिती पोथ्या, पुराणे, स्थानपोथ्या, धर्मग्रंथ, त्यावरील टीका मिळते. अशा प्रकारचे साहित्य आजही मठ, मंदिरे, मशिदी, विहार इत्यादी संबंधित संस्थांमधून मिळते. अधार्मिक साधनांचे विभाजन स्त्रीविषयक रोजनिशी, आठवणी, आत्मकथा, गद्य-पद्य, नाटक, काव्ये या प्रकारचे साहित्य तसेच गाणी, लोकगीते, छायाचित्रे, चित्रकला व मौखिक इतिहास यांमधून उपलब्ध होते.

भारतातील स्त्रीविषयक संदर्भ साधने कालखंडानुसार **तीन विभागांत** विभागली जातात. **(१) प्राचीन कालखंड (२) मध्ययुगीन कालखंड (३) आधुनिक कालखंड.**

## पुराभिलेखीय साधने

### १. प्राचीन कालखंड

### (इ.स.पू. २५०० ते इ.स. १८०० या कालखंडातील साधने)

**१. इ.स. पू. २५०० ते इ.स. पूर्व १०००** : हा वैदिक साहित्य, संहिता, ब्राह्मण ग्रंथ, उपनिषदे, आरण्यके इत्यादी वैदिक साहित्यांचा काळ आहे. साधारणतः इ.स. च्या सुरुवातीपासून स्त्रियांची दुरवस्था झाल्याचे दिसून येते. वैदिक काळात तुलनात्मकदृष्ट्या स्त्रियांची स्थिती काहीशी बरी होती. अर्थात, हा वैदिक समाजही पुरुषसत्ताक संस्कृतीचाच पुरस्कर्ता होता. पण काही अभ्यास वैदिक काळातील स्त्रीला पुरुषाबरोबरचे गौरवाचे स्थान होते असे मानतात. मनुस्मृतीच्या काळापासून पुढे स्त्रीच्या दर्जाचा ऱ्हास व अवनती झाल्याचे दिसून येते. या मताचे हे लिखाण पुरस्कार करते.

महाभारत, रामायण या प्राचीन ग्रंथांतून स्त्रीविषयीची बरीच माहिती उपलब्ध होते. हे ग्रंथ एकहाती नाहीत. कारण असंख्य लोक शेकडो वर्षे त्यात भर घालून बदल करीत होते. त्यामुळे वेगवेगळ्या आवृत्यांमधील स्त्री-चित्रण बऱ्याच वेळा विरोधाभासात्मकही असते. या दोन्ही ग्रंथांतून प्राचीन कालखंडातील स्त्रियांचे जीवन, राहणे, समाजातील स्थान, समाजमूल्ये यांची माहिती मिळते. महाभारतातील सत्यवती,

अंबा, अंबालिका, गांधारी, कुंती, द्रौपदी, दुःशला, सुभद्रा, रुक्मिणी, सत्यभामा, राधा (कर्णाची पालकमाता), गंगा, शर्मिष्ठा, देवयानी, दमयंती, वनिता, कद्रू, दिती, अदिती, क्रोधा वगैरे तेरा दक्षकन्या यांचे संदर्भ मिळतात. लग्न न करता वेदाभ्यास करणाऱ्या स्त्रीस 'ब्रह्मवादिनी' म्हणत. अशा अनेक स्त्रियांचे उल्लेखही मिळतात. रामायणातील इंदुमती, उमा, सुदक्षिणा (दिलिपाची राणी) अहिल्या, सीता, रंभा, कौशल्या, सुमित्रा, कैकयी, अंजना, तृणबिंदूकन्या, कालिंदी (सगर राजाची माता), अनसूया, शबरी, मंथरा, त्राटिका, शूर्पणखा, मंदोदरी, तारा, कैकसी (रावणाची आई), ताटका, केशिनी-सुमती (सगरपत्नी) तर पुंजीकस्थला, स्वयंप्रभा, हेमा यांचे उल्लेख अप्सरा म्हणून आले आहेत.

वेदकाळातील संवादसूक्तामधल्या धरून अनेक सूक्तप्रणेत्या स्त्रियांचे उल्लेख मिळतात. त्यामध्ये कपाला, घोषा, सूर्या, गोधा, अदिती, विश्ववारा, आत्रेयी, वागम्भृणी वाक्, श्रद्धा, इंद्राणी (स्त्री मुक्तीची आद्यप्रणेती), विश्पला, मुद्गलानी, वृत्रमाता, दनू, सरस्वती या लढाऊ लष्करी शिक्षण घेतलेल्या स्त्रिया म्हणून उल्लेखिल्या जातात. ऋग्वेदकालीन स्त्रीविषयक मर्यादित संदर्भ मिळतात. यातील काही ऋचा स्त्रियांनी लिहिलेल्या असाव्यात पण भक्कम पुरावे मिळत नाहीत.

उपनिषदकालीन स्त्रियांमध्ये गार्गी, मैत्रेयी, कात्यायानी या स्त्रिया ज्ञानसंपादन केलेल्या स्त्रिया म्हणून ओळखल्या जातात. जबाला ही शूद्र स्त्री होती तर इतरा ही ब्राह्मण ऋषीची शूद्र पत्नी होती. तिला समाजात वर्णभेदाच्या प्रभावाने कोणताही मानसन्मान नव्हता. तिच्या मुलाने ऐतरेय उपनिषद व ऐतरेय ब्राह्मणे लिहिली.

वैदिक काळातील हिंदू साहित्य संस्कृतमध्ये आहे. वेदापूर्वीचे साहित्य मिळत नाही. वेद, उपनिषदे, स्मृती, मनुस्मृती, याज्ञवल्क्य स्मृतींचा इ.स.पू. २ रे ते इ.स. २ रे शतक निर्मितीकाळ मानला जातो. त्यात स्त्रीविषयक कायदे, स्त्रियांवरील निर्बंध, मौखिक परंपरा व स्त्रीविषयक हस्तलिखितांचे संकलन मोठ्या प्रमाणात ब्रिटिश काळात व तत्पूर्वी काही प्रमाणात मोगल काळात झाले होते.

**मनुस्मृती :** सातवाहनकाळ इ.स.पू. ३ रे शतक ते इ.स.पू. २ रे शतक या काळात मनुस्मृतीचे लेखन झाले. यात मानवधर्म सूत्रांविषयी माहिती आहे. यांचा लेखक एक नाही. कायदा, सामाजिक गोष्टीविषयक स्पष्ट मांडणी दिसते. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था यांचे उल्लेख मिळतात. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा व त्यांना वागणूक कशी दिली जात होती हे लक्षात येते.

**याज्ञवल्क्य स्मृती :** डॉ. आ. ह. साळुंखे यांनी याज्ञवल्क्य स्मृतीचा काळ इ.स.पू. ३ रे ते ५ वे शतक असा मानला आहे. पण या कालखंडाबाबत विविध संशोधकांत मतभिन्नता आढळून येते. मौर्यकालीन कौटिल्याचे अर्थशास्त्र

(इ.स.पू. ४ थे शतक) यामध्ये पारंपरिक पुरुषसत्ताक पद्धती, विवाह, दासी यांचेविषयी माहिती मिळते. श्रवणबेळगोळ येथील 'आयागपट्ट' हा चंद्रगिरी येथील डोंगरावर आहे. तेथील शिलालेखातून तत्कालीन स्त्रियांविषयक माहिती मिळते. त्याचबरोबर वात्स्यायनाचे 'कामसूत्रही' सांस्कृतिक इतिहासाची मौलिक साधने आहेत. निरनिराळी नाटके व काव्ये यावरूनही तत्कालीन सांस्कृतिक स्थिती समजते.

**२. इ.स.पू. ८०० ते इ.स.पू. ३००** : हा निरुक्तै श्रौतसूत्रे, गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे, पाणिनीची अष्टाध्यायी इत्यादी ग्रंथांचा काळ होय.

**३. इ.स.पू. ३०० ते इ.स. ३००** : कौटिल्याचे अर्थशास्त्र, नारदस्मृती इत्यादी ग्रंथ तयार झाले.

**४. इ. स. ३०० ते इ.स. ९०० :** इतर स्मृती व पुराणे तयार झाली.

**५. इ.स. ९०० ते इ.स. १८००** : या काळात स्मृतींवरील टीका आणि धर्मविषयक निबंध म्हटले जाणारे संकल्पनात्मक ग्रंथ निर्माण झाले. प्राचीन साहित्याचे वारंवार लिखाण झाल्याने त्याचा निश्चित कालखंड ठरविणे अवघड होते.

**६. १८०० ते नंतरचा काळ** : हा काळ पाश्चात्य प्रभावामुळे नव्या मूल्यांसाठी झगडण्याचा तसेच धार्मिक व पुनरुज्जीवनवादी चळवळीचा आहे.

## गुप्त व वाकाटकांचा कालखंड

मनुस्मृतीचा पुढील टप्पा म्हणजे गुप्तकाळ. या काळात १८ पुराणे, स्मृती, याज्ञवल्क्य स्मृती यासारखे स्मृतिग्रंथ लिहिले गेले. त्याआधारेच शिक्षेचे निर्बंध राजा लावू लागला. या ग्रंथामुळे राजपदाला व त्यांच्या कार्याला कायदेशीरपणा प्राप्त झाला. संस्कृतभाषा व वाङ्मय यांना राजाश्रय लाभून काव्य, नाटक, तत्त्वज्ञान, ज्योतिष, गणित इ. वाङ्मय शाखांतून युगप्रवर्तक साहित्य निर्माण झाले. चित्रकला, शिल्प, स्थापत्य, मूर्तिकला, नृत्य, संगीत इ. कलाक्षेत्रांत नावाजण्यासारखी निर्मिती झाली. या सर्वांतून स्त्रीविषयक माहिती उपलब्ध होते. नारद, बृहस्पती, कात्यायन व व्यास इत्यादी स्मृतिग्रंथ या काळात लिहिले गेले. नारदस्मृतीमध्ये स्त्रियांना विशिष्ट परिस्थितीत पुनर्विवाहाची परवानगी दिली आहे.

**नाटक व काव्य** : काव्य व नाटकांच्या प्रांतामध्ये कालिदास हा सर्वमान्य साहित्यिक मानला गेला आहे. 'मेघदूत' मध्ये विरही यक्षाचा प्रेमसंदेश अमर झाला आहे. तर 'कुमारसंभव' मध्ये विशुद्ध प्रेमाचा आदर्श वर्णिला आहे. शाकुंतल ही अमर काव्यकृती आहे. शकुंतलेचे विशुद्ध प्रेम, उदात्त त्याग यांचे कलात्मक चित्रण या नाटकात आहे. शूद्रक राजाचे 'मृच्छकटिकम्' या सामाजिक नाटकात वेश्या कन्या वसंतसेना व चारुदत्त यांच्या प्रेमाची कथा रंगवली आहे.

**नाटके :** भासाने १३ नाटके लिहिली. त्यापैकी 'स्वप्नवासवदत्तम्' हे स्त्री संदर्भाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. भवभूती यांची 'उत्तररामचरितम्', 'महावीरचरितम्', 'मालतीमाधवम्' ही नाटके प्रसिद्ध आहेत. शूद्रकाचे 'मृच्छकटिकम्', भट्टनारायणाचे 'वेणीसंहारम्', श्रीहर्षाचे 'रत्नावली' व 'नागानंदम्' यामधूनही तत्कालीन स्त्रियांविषयी संदर्भ मिळतात. कालिदास 'विक्रमोर्वशीयम्', 'मालविकाग्निमित्रम्', 'अभिज्ञान शाकुंतलम्' ही नाटके भारतीय साहित्याचा मानबिंदू ठरली. सर विल्यम जोन्स याने कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतलम्' या नाटकाचा अनुवाद केल्याने पाश्चात्य जगाचे लक्ष भारतीय प्राचीन संस्कृत वाङ्मयाच्या गुणवत्तेकडे लागले. कालिदासाने रंगवलेल्या स्त्री पात्रांत धारिणी, औशीनरी, सुदक्षिणा, इंदुमती, इरावती, उर्वशी, यक्षपत्नी, पार्वती, सीता, शकुंतला, मालविका, प्रियवंदा व अनसूया या तेरा जणींना विशेष स्थान द्यावे लागते. यात धारिणी, औशीनरी, सुदक्षिणा आणि काही प्रमाणात अनसूया या प्रौढ व गंभीर स्वभावाच्या स्त्रिया व बाकीच्या सर्व कलानिपुण आणि विलासी वृत्तीच्या तरुणी आहेत. या स्त्रियांच्या स्वभावातील विविधता कालिदासाने मांडली आहे. धारिणी किंवा औशीनरी यांच्यातील गांभीर्य, इरावतीची स्त्रीसुलभ ईर्ष्या, मालविकेची मुग्धता, उर्वशीची विलासलोलुपता, पार्वतीची उग्र साधना, शकुंतला व सीता यांचा प्रखर स्वाभिमान, सुदक्षिणेची कर्तव्यपरायणता आणि प्रियवंदेची परिहासप्रियता हे मनुष्यस्वभावात आढळणाऱ्या वैचित्र्यपूर्ण विलोभनीयतेचेच आविष्कार आहेत. कालिदासाच्या काव्यातील नायिका व त्याचे नारीविश्व म्हणजे सौंदर्यांच्या लोभस व्यक्तिमत्त्वाचे संदर्भ आहेत. स्त्रीचे शरीर कोमल फुलासारखे असेल. परंतु हे फूल सोनेरी असते आणि त्यात पराकोटीचे कष्ट सहन करण्याची मूलभूत शक्ती असते म्हणून कालिदासाने स्त्रीला मानाचा मुजरा केला आहे हेही तितकेच अविस्मरणीय आहे.

**काव्ये :** मेघदूतम् (खंडकाव्ये), 'रघुवंशम्', 'कुमारसंभवम्', 'किरातार्जुनीयम्', 'शिशुपालवधम्', 'नैषधीयचरितम्' यांसारखी महाकाव्ये आजही तत्कालीन स्त्रीजीवनाचे दर्शन घडवितात. त्यामुळे संदर्भ साधने म्हणून या सर्वच साहित्याचे महत्त्व वाढले आहे. या साहित्यामधून चित्रित स्त्री ही एक उपभोग्य वस्तू व पुरुषाला मोहित करणारे तिचे सौंदर्य या अंगाने लिहिले गेले आहे.

**चित्रे :** अजिंठा येथील लेणी क्र. १० मधील भित्तिचित्रात मूर्च्छा आलेली राणी तर १६ व्या लेण्यातील मरणोन्मुख राजकन्या हे प्रसंग वास्तवपूर्ण व कलात्मक आहेत. १७ व्या लेण्यातील एका युवतीच्या प्रसाधनाचे चित्र आहे. नाजुकता, सौंदर्य, उदात्तता व कारुण्य यांच्या दृष्टीने या कलाकृतींना अविस्मरणीय कलाकृती म्हणून मान्यता आहे.

## गुप्तोत्तर कालखंड

उत्तर आणि दक्षिण भारतात या काळात मूळ स्मृतींवर टीका ग्रंथ तयार झाले. मिताक्षरा, मनुस्मृती टीका, दायभाग यामध्ये स्त्रीसंबंधी कायदे आहेत. बंगालमधील स्त्री-जीवनावर याचा प्रभाव आढळतो. सती, केशवपन, वारसाहक्क यासाठी यातील नियम प्रमाण मानले जात.

१८ व्या व १९ व्या शतकामध्येही मिताक्षरा व दायभाग यांचाच आधार स्त्रीविषयक प्रथांना मानला जात असे. १२ व्या शतकापर्यंत या ग्रंथांचाच प्रभाव स्त्रीविषयक रूढी व चालीरीतींवर होतो. १२ व्या शतकात यादव काळात हेमाद्रीने 'चातुर्वर्ण्यचिंतामणी' हा ग्रंथ लिहिला. या वेळीही वर्णव्यवस्थेचा पगडा समाजजीवनावर होता. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा व स्थानात फारसा फरक झाला नाही. उलट, मुस्लीम संस्कृतीच्या प्रभावाने स्त्रियांवरील बंधने, पडदा पद्धती यांचे प्रस्थ वाढले.

## प्राचीन शिलालेखातील महिला

अनेक जुन्या वास्तू, मंदिरे, शिलालेख, स्तंभालेख, तोरणे, मूर्तींची बैठक यावर स्त्रियांच्या यशोगाथा कोरलेल्या मिळतात. हे विविध कोरीव आलेख भारतीय स्त्रीविषयक इतिहासाची विश्वसनीय साधने आहेत. शिलालेख व ताम्रपट यामधून राजवंशीय स्त्रियांनी दिलेले धार्मिक दान यांची माहिती मिळते. तत्कालीन तिथी निर्देशाकांवरून कालनिर्णयास मदत होते. तसेच सामाजिक रिवाज व धर्मसमजुती यांचेही दर्शन होते. वाङ्मयीन साधनांमध्ये धार्मिक, लौकिक व परकीयांची इतिवृत्ते यांचा समावेश होतो. वेद, वाङ्मय व स्मृती, आर्ष काव्ये यातून भारतीय संस्कृतीचे विविध पैलू उजेडात येतात. बौद्ध आणि जैन वाङ्मयातून भिक्षुणींचे व साध्वींचे जीवन ज्ञात होऊन इतिहासाची जुळणी करण्यास मदत होते. हिंदूंचे पुराणग्रंथ, बौद्ध धर्माच्या जातक कथा व जैनांचे आगमग्रंथ यातून तत्कालीन स्त्रीविषयक कौटुंबिक, सामाजिक जीवनाचे दर्शन घडते.

उत्तरेत अधिक शिलालेख मथुरा, लखनौ संग्रहालयात मिळतात. तर दक्षिणेकडील हळेबीड, वेल्लूर, कोणार्क सूर्यमंदिर, खजुराहो, अजिंठा-वेरूळ लेणी, श्रवणबेळगोळ येथे मिळतात. यामधून त्यांचे स्थान, दर्जा, शिक्षण, आर्थिक अधिकार यांविषयी अनुमाने काढता येतात.

१. वाकाटक राणी प्रभावती गुप्ता हिची माहिती इ. स. ४ थ्या शतकातील अकोल्याजवळील वासिम येथील शिलालेखातून मिळते. त्यामध्ये तिने केलेले यज्ञदान, शिक्षण घेण्याचा, स्वयंवराचा अधिकार यांची माहिती मिळते.

२. कुषाण सम्राट कनिष्क हा गौतमीपुत्र सातकर्णीचा समकालीन होता. त्याच्या

कालखंडात इ.स. ८५ मध्ये आर्यबुद्धी श्रीचा शिष्य वाच आर्य संन्धि याची बहीण आर्यजया हिने तीर्थंकरची प्रतिमा निर्माण केली. (ए.इं.१, ३९१, स. १९)

३. **खुडा** : (क्षुद्रा) कनिष्काच्या काळात इ.स. ८३ मध्ये देवपाल श्रेष्ठींची कन्या व सेन श्रेष्ठी पत्नी खुडा हिने वर्धमान महावीरांच्या मूर्तीचे दान केले. (ए.इं.१, ३८२ स.)

४. **दिना** : (दत्ता) या श्राविकेच्या पतीचे नाव मतिल. पुत्राचे नाव जयपाल, देवदास व मुलीचे नाव नागदत्ता असे लिहिले आहे. तिने इ.स. ९८ मध्ये आर्यसंघसिंह यांच्या आदेशाने वर्धमान महावीरांची मूर्ती दान दिली. (ए.इं. १ - ३९५ सं. २८)

५. **कुमारमित्रा** : ही तपस्विनी आचार्य बलदत्त यांची शिष्या होती. हिचा मुलगा कुमारभट्ट याने आपली विचारशील किंवा ज्ञानी आई कुमारमित्रा हिच्या प्रेरणेने इ.स. ११३ मध्ये वर्धमान महावीर प्रतिमेचे दान केले. या शिलालेखातून हे प्रतीत होते की, तिने 'विधवा झाल्यावर संन्यास घेतला व आपल्या पुत्रास उपदेश करून ही प्रतिमा बनवून दान करावयास लावली असावी.' असे स्त्रीविषयक फारसे संदर्भ मिळत नाहीत, पण हा शिलालेख हे दुर्मीळ उदाहरण मानावे लागेल. मथुरेच्या अभिलेखातून स्त्रिया या पुरुषांच्या उपदेशिका नव्हत्या असे उल्लेख मिळतात.

६. **वसू** : ही लवणशोभिका नावाच्या गणिकेची कन्या होती. तिने एक आयागपट्ट म्हणजे अखंड शिलालेख तयार केला. (मथुरा संग्रहालय स. क्यू. २) त्या महत्त्वपूर्ण शिलालेखात ''लवणशोभिकेची मुलगी श्राविकासुंदरी गणिका वसू हिने नियामग्रंथ मुनींच्या पूजेसाठी एक देवकुल आयाम सभा, आयागपट्ट स्थापन केला. (स्मिथ जै.प. ५१, पृ. १०३) यामध्ये अरिहंताची पूजा करणारे देव दाखवले आहेत. तोरणाच्या दोन्ही बाजूला आकर्षक युवती आहेत. पायऱ्यांच्या एका बाजूला पुरुष व स्त्रिया आहेत. हे शिल्प पहिल्या शतकातील आहे. जे कुशाण किंवा त्या पूर्वीचे असावे. डॉ. ब्युलर यांच्या मते, ''अशा मानसस्तंभाची व स्तूपाची पूजा करत. म्हणूनच त्यावर देवांच्या प्रतिमा मिळतात.''


**अत्तिमब्बे**

होयसळ राजा विष्णुवर्धनची पत्नी 'शांतला', नामी सेनापतीची पत्नी 'शांतिकब्बे' यांचे उल्लेख शिलालेखातून मिळतात. बिदनूरचे प्रसिद्ध 'हरिचक्रेश्वर मंदिर', श्रवणबेळगोळ येथील 'सवतिगंधवरण मंदिर' यांची निर्मिती स्त्रियांनीच केली. **अत्तिमब्बे** हिने गदग तालुक्यातील लक्कुंडी या गावी ५२, ५३ नंबरच्या शिलालेखावरून

मंदिरासाठी दान दिल्याचे उल्लेख मिळतात. यावरून राजवंशातील स्त्रिया, मंत्री, श्रेष्ठी यांच्या पत्नी त्यांची धार्मिक कृत्ये, दाने यावरून समाजातील त्यांचे स्थान व आर्थिक सत्ता समजण्यास मदत होते.

## जैन साहित्यातील स्त्री-संदर्भ व साहित्य साधने

जैन परंपरेत शास्त्र या शब्दासाठी 'आगम' हा शब्द प्रचलित आहे. प्राचीन काळी त्यास 'श्रुत' किंवा 'सम्यक श्रुत' असेही संबोधत. भगवान महावीरांच्या उपदेशकाळामध्ये जैन धर्म मगध, विदेह, काशी, कोशल या प्रदेशांत प्रसारित झाला. त्यांच्या स्त्रीविषयक कार्यामुळेच त्याचा गौरव 'नारी जाति के उद्धारक' म्हणून केला जातो. महावीरांनी केलेला उपदेश त्यांचे शिष्य गणधर यांनी आगम ग्रंथातून सूत्रबद्ध केला. महावीरांच्या निर्वाणानंतर ६८३ वर्षे हे आगमग्रंथ सूत्रबद्ध होत राहिले. श्वेतांबर परंपरेनुसार संख्या १२ आहे पण त्यापैकी १२ वा 'दृष्टिवाद' हा काळाच्या ओघात नष्ट झाला. ११ आगमग्रंथ पुढीलप्रमाणे - आचारांग, सूत्रकृतांग, स्थानांग, समयवायंग, भगवती, ज्ञाताधर्म कथा, उपासकदशा, अन्तकृद्‌दशा, अनुत्तरोपपातिकदशा, प्रश्नव्याकरण, विपाकश्रुत.

आचारांगामध्ये भिक्षुंच्या आचरणासंदर्भात भिक्षुणींचा उल्लेख येतो. सूत्रकृतांगातील स्त्रीपरिज्ञा अध्यायात मोक्षमार्गी पुरुषांना स्त्रिया काया-वाचा-मने कसे भुलवितात, तसेच भिक्षूला वश करून घेतलेल्या स्त्रिया भिक्षुंकडून कशी चाकरी करून घेतात याचे वर्णन मिळते. त्यातूनच स्त्रिया वापरत असलेल्या गृहोपयोगी वस्तूंची माहिती मिळते. स्थानांग दानाचे प्रकार, कारणे, दहा राजधान्या तर समवायंगात स्त्री-चित्रणाच्या दृष्टीने फार सामग्री मिळत नाही. भगवतीमध्ये जयंती नावाची श्रमणोपासिका धर्मसभेत महावीरांना कर्मबंध, सिद्धगती याविषयी मौलिक प्रश्न विचारते व प्रवज्या स्वीकारून सिद्धगतीस जाते. ज्ञाताधर्मकथेत धारिणी व तिचे शयनगृह, सार्थवाही, देवदत्त, गणिका, श्राविका, शावय्या, रोहिणी, विदेह राजकन्या, भृत्वी, पोहीला, नागश्री, सुकुमारिका व द्रौपदी यांचे उल्लेख कथांच्या ओघात त्यांची कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवन यांविषयी माहिती देऊन जातात. उपासकदशामध्ये महावीर म्हणतात, 'श्रावक-श्राविका घरात राहून अनेक उपसर्ग सहन करतात तर साधु-साध्वींनी अनेक उपसर्ग सहन करणे अपेक्षित आहे.' अन्तकृद्दशा यामध्ये साधु-साध्वींचे जीवन, तप तसेच पद्मावती, गौतमी, गांधारी, लक्ष्मणा, सुसीमा, जांबवती, सत्यभामा इ. कृष्णपत्नींचा उल्लेख येतो. अनुत्तरोपपातिकदशा व प्रश्नाव्याकरण मध्ये तत्कालीन समाजाची व संस्कृतीची कल्पना येते. विपाकश्रुतातून स्त्रीजीवनाची विपुल माहिती उपलब्ध होते.

## बौद्ध साहित्यातील स्त्री-संदर्भ व साहित्य साधने

बौद्ध काळात निर्माण झालेले साहित्य पाली भाषेत होते. त्यातून बौद्धकालीन स्त्रियांविषयी माहिती मिळते. 'थेरगाथा', 'थेरीगाथा' या ग्रंथांतून बुद्धाविषयी माहिती मिळते. 'थेरी' म्हणजे वृद्ध स्त्रिया. थेरीगाथांमध्ये बौद्ध भिक्षुणींनी लिहिलेल्या कथांचा समावेश आहे. भिक्षुणी या समाजातील सर्व स्तरांतून व घरातून येत. काही थेरी विद्वान आणि कर्तृत्ववान होत्या. त्यांच्या जीवनातील बऱ्यावाईट अनुभवांचे मार्मिक चित्रण थेरीगाथातून मिळते.

बौद्ध जातक कथा 'त्रिपिटिका' या ग्रंथातून बौद्ध भिक्षुणींचा एकंदर आचारविचार, नियम, भिक्षुंच्या तुलनेत संघातील त्यांचे स्थान, त्यांच्यातील वाद-विवाद व कलह याविषयी माहिती मिळते. त्रिपिटिकांचे प्रनिकाय केले असून त्यातील खुद्दनिकाय, धम्मपदजातक कथा, थेरगाथा या ग्रंथांतून व साहित्यातून समकालीन स्त्रियांची माहिती मिळते. 'अधिधम्मपिटक' या ग्रंथात स्त्रीधर्माविषयी माहिती मिळते तर विनयपिटकात दिलेल्या अठ्ठगुरुधम्म या नियमातून गौतम बुद्धांचा स्त्रियांकडे बघण्याचा सहानुभूतिशून्य व उपेक्षा करणारा दृष्टिकोण दिसतो असे मत दुर्गा भागवत यांनी मांडले आहे. बौद्ध आगम ग्रंथातून उपासक स्त्रियांविषयी बरीच माहिती मिळते.

बौद्ध आगमामध्ये कन्यांचा दर्जा जैन आगमापेक्षा काही प्रमाणात दुय्यम दिसतो. जातककथा व संयुतनिकाय मध्ये कन्या जन्माने 'पसेनदी' राजा दुःखी झालेला दिसतो. त्याचे सांत्वन गौतम बुद्ध करतात. विनयपिटक व मज्झिमनिकायात कन्या कोणकोणत्या देखरेखीखाली असते याचे वर्णन येते. कन्येला मर्यादित स्वातंत्र्य असते. भरणपोषणाखेरीज इतर आर्थिक अधिकारांची नोंद नाही. बौद्ध साहित्याचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान म्हणजे मुलींना विवाहाची सक्ती न करता त्या उपासिका किंवा भिक्षुणी होत असत व त्यांचेकडे आदराने पाहण्याची समाजाची दृष्टी असे याचे उल्लेख स्पष्टपणे येतात.

गणिका या भिक्षुणी संघात सहजपणे प्रवेश करत. गौतम बुद्धांनी आम्रपालीच्या भोजनाचा स्वीकार केला होता. त्यामुळे गणिका व वेश्या ह्या तत्कालीन समाजाचे एक अभिन्न अंग होते. त्या धनिक असत. त्यांच्याकडे राजा, अमात्य, श्रेष्ठीपुत्र व सामान्य माणसेही जात असत. याचे उल्लेखही गणिका व वेश्या यांचे सौंदर्य, आर्थिक स्थिती, कामवासना विषय, भोग वृत्ती, स्त्री-पुरुष आकर्षण यावर प्रकाश टाकतात.

बौद्ध व जैन साहित्यांत विधवा विवाहाचे उल्लेख नाहीत. कारण अशा बालविधवा (बालरंडा) संसारतापांनी ग्रस्त होऊन श्रमणी बनत. त्यामुळेच सतीप्रथेचे उल्लेख फारसे मिळत नाहीत. कुटुंबस्वास्थ्य व अपत्यप्राप्ती या कारणांनी रूढी व अविश्वासाचे आगर बनलेल्या स्त्रियांना बरोबरीचे स्थान दिल्याचे उल्लेख जैन व बौद्ध साहित्यांतून मिळतात.

## २. मध्ययुगीन कालखंड

संस्कृत भाषेच्या दृष्टीने सुलतानशाहीचा कालखंड भरभराटीचा नसला तरी समाधानकारक ठरला. जयसिंग सुरी (१२१९-१२२९) याने लिहिलेले 'हमर-मद-मर्दन' हे नाटक, रवी वर्मा याने लिहिलेले 'प्रद्युम्न-अभ्युदय' हे नाटक, विद्यानाथ याने लिहिलेले 'प्रताप रुद्रकल्याण', बाणाने लिहिलेले 'पार्वती' हे नाटक ही स्त्रीसाहित्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण साधने ठरतात. रामानुज, जिमुतवाहन, दैवसरी, जीवगोस्वामी या प्रसिद्ध लेखकांचे वाङ्मय याच काळात झाले. भक्तिमार्ग चळवळ व संत स्त्रियांचे लेखन याच कालखंडात मिळते. उर्दू भाषेची निर्मिती, सुफी संतांची व वाङ्मयांची निर्मिती येथेच सुरू झाली.

### (अ) मध्ययुगीन स्त्रीविषयक शिलालेख व ताम्रपट

मध्ययुगीन स्त्रियांच्या अभ्यासासाठी काही शिलालेख व ताम्रपट उपलब्ध आहेत. सुलतानशाही, मुघल काळ, मराठा, विजयनगर, बहामनी काळातील स्त्रियांविषयी संदर्भ देणारे काही शिलालेख आहेत.

**१. चितोड शिलालेख** : हा शिलालेख पार्श्वनाथाच्या मंदिरात असून राणी जयतुल्लादेवी हिच्या आज्ञेने केला आहे. या शिलालेखात मंदिरात दान दिल्याचे आढळते.

**२. दिलवाडा शिलालेख** : हा शिलालेख संस्कृत आणि स्थानिक भाषेत असून इ.स. १३३४ मधील आहे. यामध्ये स्त्रीविषयक धार्मिक व सामाजिक माहिती मिळते.

**३. कुंभलगड शिलालेख** : हा १५ व्या शतकातील असून राजस्थानातील स्त्रियांची आश्रमव्यवस्था, शिक्षण, सण, उत्सव, शिवरात्री, वसंतोत्सव यांविषयी माहिती मिळते.

**४. विजयनगरकालीन ताम्रपट** : विजयनगरकालीन स्त्रियांची स्थिती समजण्यासाठी शासनम्, जयपत्रम्, आज्ञापत्रम्, प्रज्ञापत्रम् असे ताम्रपट मिळतात. यातून तत्कालीन राजाचे जाहीरनामे व स्त्रीविषयक माहिती मिळते.

**५. सुलतानशाही शिलालेख** : सुलतानशाहीतील स्त्रियांचा उल्लेख असलेले शिलालेख व त्यांची माहिती इ.पी. ग्राफिका इंडिका, इ.पी. ग्राफिका कर्नाटिका, इण्डो इस्लामी या ग्रंथांतून प्रसिद्ध झालेल्या लेखनातून मिळते.

### (ब) सुलतानशाहीतील प्रवासलेखन

**१. अल्बेरूनी** : जन्माने तुर्क असलेल्या भारतात येऊन गेलेला, काही वर्षांपर्यंत उत्तर हिंदुस्थानात राहिलेला हा प्रवाशी. त्याचा ग्रंथ 'अल्बेरूनीसा भारत' यामध्ये तत्कालीन समाजाची माहिती मिळते.

२. **इब्नबतुता** - इ.स. १३३३ मध्ये हा सिंधमध्ये आला व ८ वर्षे भारतात राहिला. त्याने 'रेहला' हे प्रवासवर्णन लिहिले. त्यात सिंधच्या स्त्रियांविषयी माहिती मिळते.

३. रझिया सुलतान हिने लिहिलेल्या 'चाचनामा' (११९२) या ग्रंथात सिंधचा इतिहास व त्यातील स्त्रियांची माहिती मिळते.

४. चंदवरदाई हिने लिहिलेल्या 'पृथ्वीराजरासो' या ग्रंथात संयोगिता व पृथ्वीराज यांची प्रेमकथा व तत्कालीन जीवनपद्धती त्यांची प्रेमकथा, विवाह व त्यातून झालेले युद्ध यांची माहिती मिळते.

५. अमीर खुस्रो या परकीय प्रवाशाने लिहिलेल्या ग्रंथात 'पर्शियन गल्फ' तसेच देवल-देवी खिज्रखानी हिची व समकालीन स्त्रियांची माहिती मिळते.

६. महमद जायसी याने लिहिलेल्या 'पद्मावत' या ग्रंथात राजस्थानी स्त्रियांविषयी माहिती मिळते.

७. इझाझ-ए-फुसवी याच्या लिखाणातून स्त्रियांच्या गुलामगिरीविषयी माहिती मिळते. त्याच्या मते, तुर्की मुली गोऱ्या व नाजूक असतात. चिनी मुली सुगंधित असतात तर भारतीय मुली सौम्य स्वभावाच्या असतात असे उल्लेख सापडतात.

८. मिनहाज-उल्-सिराज या ग्रंथात तबकाद-ए-नासिरी ही दिल्लीतील एक प्रमुख मदरसा होती आणि तिची प्रमुख अध्यापक माहमअनगा ही स्त्री असल्याचे उल्लेखं मिळतात.

## (क) मुघलकालीन स्त्री-संदर्भ साधने

प्रेषित महमद स्त्री व पुरुष यांना समान मानत असे. स्त्रियांचा दर्जा कायदेशीरपणे कुराणाने उंचावला असला तरीही मुघलकालीन स्त्रियांना पुरुषांबरोबर दर्जा दिला गेला नाही याचे उल्लेख मिळतात. खलिफा अबूफखर अलिम यांचा स्त्रियांबाबतीत असाच दृष्टिकोण होता. यावरून मध्ययुगीन काळातील स्त्रियांचा दर्जा व समाजातील स्थान यांविषयी माहिती मिळते.

१. 'बाबरनामा' व 'तुझीकी-बाबरी' या ग्रंथांतून मध्ययुगीन स्त्रियांविषयी व त्यांच्या स्तुतीविषयी उल्लेख मिळतात.

२. खानजहाँ ही बाबराची बहीण. तिने लिहिलेल्या लिखाणातून स्त्रियांना शिक्षण दिले जात असे.

३. गुलबदन बेगम हिने लिहिलेल्या 'हुमायुननामा' या ग्रंथात वाङ्मयीन माहिती मिळते.

४. अकबराची दाई (होस्टरमदर) माहमअनगा ही सामर्थ्यवान स्त्री असून तिचे राजकारणात वर्चस्व होते. तसेच तिने दिल्लीत मदरसा-ए-बेगम चालू केल्याचे उल्लेख मिळतात.

५. तुझक-ई-जहांगीरी या ग्रंथात नुरजहानची आवड, अत्तरे, कापड, अलंकार, तिने लावलेल्या बागा व फुले यांविषयी माहिती मिळते.

६. अब्दुलहमीद लाहोरी याने लिहिलेल्या 'पातशहानामा' या ग्रंथात राजघराण्यातील स्त्रिया तसेच शहाजहान व मुमताज यांच्याविषयी माहिती मिळते.

७. औरंगजेबाची मुलगी झेब-उन्-निसा व झिनत-उन्-निसा यांचा आपल्या पित्यावर प्रभाव होता. याचे उल्लेख त्यांनी लिहिलेल्या काव्यातून मिळतात. तसेच छ. शाहू (सातारा) व येसूबाई (छ. संभाजींची पत्नी) यांचे प्राण वाचवण्यास झिनत-उन्-निसा हिला यश मिळाले याचेही उल्लेख मिळतात.

८. 'मासीर-ई-आलमगिरी' मध्ये औरंगजेबाच्या जनानखान्यात जन्मलेल्या मुली अभ्यास करत, कुराणाचा अभ्यास करून त्याचे भाषांतर करत, ईश्वरोपासना यात मग्न असत याचे उल्लेख सापडतात.

९. अहमदनगर येथील हुसेन निजामशहा याची कन्या व अलीआदिलशहा पहिला याची पत्नी चांदबीबी हिने राज्याच्या संरक्षणासाठी युद्धात मृत्यू पत्करला याचे उल्लेख मिळतात.

१०. विजापूरमधील युसुफ आदिलशहा याची बहीण दिलशादआघा व राजमाता पुंजीखतुन या इस्माईल आदिलशहाकरिता लढल्या होत्या.

## (ड) विजयनगरकालीन स्त्री-संदर्भ साधने

विजयनगरकालीन स्त्रीविषयक लिखित पुरावे, प्रवासवर्णने व ऐतिहासिक लिखाण यातून स्त्रीविषयक माहिती मिळते.

१. निकोलो काऊंटी यांच्या ऐतिहासिक वर्णनात व प्रवासवृत्तांतात स्त्रीविषयक माहिती मिळते.

२. डोमिंगो पेस या पोर्तुगीज प्रवाशाने विजयनगर राज्याला भेट देऊन त्याचे विस्तृत वर्णन लिहून ठेवले. इतिहासाच्या दृष्टीने समकालीन सतीप्रथेचे वर्णन त्याच्या लिखाणातून मिळते. तसेच 'नरेटीव्हज् ऑफ डोमिंगो पेस' या ग्रंथात स्त्रियांच्या समाजातील स्थानाविषयी माहिती मिळते. समाजातील दुसऱ्या वर्गात वारांगनांचा समावेश होत असे. त्यात देवळातील देवदासी व स्वतंत्र राहणाऱ्या गणिका होत्या. त्यांना मुख्य गृहस्थांच्या पत्नीसारखी वागणूक मिळत असे. कोणताही पुरुष वारांगनेच्या घरात जाई, त्याला दोष दिला जात नसे. स्त्रिया या स्वैरनितिमत्तेच्या होत्या, यांचेही उल्लेख मिळतात.

३. एडोरेडा बारबोसा यानेही विजयनगर साम्राज्याला भेट दिली. त्यांच्या वृत्तांतातही स्त्रीविषयक संदर्भ मिळतात. पतीच्या निधनानंतर ज्या स्त्रिया सती जात नाहीत त्यांना अवमानित जीवन जगावे लागे, त्यांचे केशवपन करत, कुटुंबातील लाजिरवाणी व्यक्ती म्हणून तिला घराबाहेर घालवत. जर विधवा स्त्रिया तरुण असतील तर तिचे शरीरविक्रय करून देवळासाठी पैसा गोळा करीत.

४. विजयनगरचा राजा कृष्णदेवराय याने लिहिलेल्या काव्यसंग्रहात समकालीन स्त्रियांची माहिती मिळते.

५. होनाई ही बुक्कांची पत्नी. हिने विजयनगरच्या विठ्ठल मंदिरातील संस्कृत आलेखाची रचना केल्याचे व राजकारणात भाग घेतल्याचे उल्लेख मिळतात.

६. गंगादेवी ही पहिल्या बुक्काची सून व कंपनाची पत्नी होती. 'कंपनविजयम्' मधून तिची माहिती मिळते. 'मधुराविजयम्', 'वीरकंपनाय चरित्रम्', 'विक्रमप्रजा-प्रथाचरित्रम्' ही महाकाव्ये कालिदासाला अनुसरून या काळात लिहिली गेली.

**काव्य**

१. जगमोहिनी ही गजपती कन्या व कृष्णदेवरायाची पत्नी. तिने लिहिलेल्या 'तुल्कपंचकाय' या विरहकाव्यात तत्कालीन स्त्रीजीवनाची माहिती मिळते.

२. मोहनानगी ही कृष्णदेवरायाची मुलगी व रामदेवरायाची पत्नी. तिने 'मोराची-परिनयन' हे प्रेमकाव्य लिहिले पण आज ते उपलब्ध नाही.

३. तिरुमलंब्बा ही अच्युत राजाची राणी. तिने 'वरदबिंकापरिनयन' हे चंपुकाव्य लिहिले. त्यात समकालीन जीवनातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संदर्भ मिळतात. तिने रचलेल्या काव्यात राजाने ब्राह्मणांना सुवर्णमेरु दान दिल्याचे उल्लेख मिळतात. तिरुमलंब्बा ही विजयनगरच्या रॉयल कोर्टमध्ये 'वोदुआ' (वाचणारी स्त्री) होती. ती नंतर राजमहीशी 'को क्वीन' म्हणून मान्यता पावली.

## मध्ययुगीन संत स्त्रियांविषयीची संदर्भ साधने

मराठीतील पहिले स्त्रीरचित काव्य म्हणून महानुभाव पंथातील महादाइसेच्या 'ढवळ्यांना' मान दिला जातो. नवरदेवाला उद्देशून गायलेली वरप्रशस्तीची ही विवाहगीते होत. या मराठी कथा-काव्यांची रचना शके १२०८ ची आहे. त्यांचे संपादन वि. भ. कोलते यांनी केले आहे.

मुक्ताबाईचे 'ताटीचे अभंग', डॉ. सुहासिनी इर्लेकर यांनी 'प्राचीन मराठी संत कवयित्रीचे वाङ्मयीन कार्य' या पुस्तकात समीक्षात्मक दृष्टीने लिहिलेले आहेत. तर श. गो. तुळपुळे यांनी 'मराठी वाङ्मयाच्या इतिहासात' त्यावर सुंदर भाष्य केले आहे. इंदुमती शेवडे यांनी 'संत कवयित्री' या पुस्तकात सर्वच मराठी संत कवयित्रींचे चरित्र

व लेखन संपादित केले आहे. त्यामध्ये नामदेवाची जनाबाई व तुकोबाची बहिणाबाई यांच्या लिखाणाचा परामर्शही घेतला गेला आहे. डॉ. शालिनी जावडेकर यांनी 'संत बहिणाबाईंची गाथा' तर डॉ. सुहासिनी इर्लेकर यांनी 'जनाबाईचे निवडक अभंग' समीक्षेसह प्रसिद्ध केले आहेत. रामदासी वेणाबाईविषयीही बरेच लिखाण मराठी वाङ्मयाच्या इतिहासात प्रसिद्ध झाले आहे.

## ३. आधुनिक कालखंड

स्त्रीविषयक ऐतिहासिक लेखनासाठी निगडित शासकीय अभिलेख, वृत्तपत्रे, भाषणे, कायदेविषयक लेख यांचे संदर्भ, अहवाल, इतिवृत्ते, आठवणी व आत्मचरित्रे, मौखिक, इतिहास, वैयक्तिक पत्रव्यवहार, दैनंदिनी, लोकगीते तसेच एकविषयी लेख (Monograms) आणि लेख यांचा उपयोग केला जातो. आधुनिक कालखंडात अशी साधने मुबलक प्रमाणात उपलब्ध होतात. आता स्त्रियांचा इतिहास लिहिताना वर्ग, जात, वंश आणि लिंगभेद या दृष्टिकोणाचा वापर करून विश्लेषण केले जात आहे. स्त्रियांच्या आयुष्याच्या नित्य नवीन पैलूंवर प्रकाश टाकणारे आणि लिंगभेदाचे (Gender) सामाजिक व राजकीय संदर्भावर होणारे व्यापक परिणाम दर्शविणारे लेख व पुस्तके नित्यनियमाने प्रसिद्ध होत आहेत. स्त्रियांबाबत इंग्रजीत उपलब्ध असलेल्या साहित्याच्या सन १९७६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या सूचीमध्ये १०० संदर्भांचा अंतर्भाव होता. तर ४ वर्षांनी कॅरोलोसाका यांनी 'Woman of South Asia – A guide to resources (Millwood, New York, Cross International Publications, 1980) या सूचीत ४६२७ स्त्रीविषयक संदर्भांची नोंद करण्यात आली होती. यानंतर प्रचंड प्रमाणात लिंगभेद आधारित लिखाण इंग्रजीसहित सर्व भारतीय भाषांतील नियतकालिकांतून प्रसिद्ध होत आहे.

उमा चक्रवर्ती व कुमकुम रॉय यांच्या मते, ‘‘प्राचीन भारतीय स्त्रियांबाबत स्वातंत्र्योत्तर काळात झालेले लेखन व अभ्यास हा ब्राह्मणलिखित संदर्भावर आधारित आहे. त्यांच्या लिखाणात वर्ग, लिंगभेद याबाबत उपग्रह भरलेले आहेत.’’

आधुनिक काळातील स्त्री-संदर्भ साधनांचा आढावा घेताना हे जाणवते की, या कालखंडात भारतीय संस्कृतीत असलेले स्त्रियांचे स्थान, आधुनिक काळात झालेले स्त्रीविषयक कायदे, सामाजिक व कौटुंबिक कायदे, समाजपरिवर्तन, स्त्रियांचे समाजातील स्थान व भूमिका यांविषयीचे उल्लेख समकालीन कागदपत्रात मिळतात. अशी संदर्भ साधने पुढीलप्रमाणे -

### १. रोजनिशी, आत्मवृत्ते, चरित्रे, आठवणी

स्त्रियांनी लिहिलेल्या रोजनिशी, आत्मवृत्ते, चरित्रे व आठवणी हे साहित्य स्त्री संदर्भ साधने म्हणून महत्त्वपूर्ण दस्ताऐवज ठरतात. रोजनिशी (डायरी) या स्त्रियांच्या

दबलेल्या आवाजातील सत्य उघडे करून सांगणारे साधन म्हणून वापरले जाते. रोजनिशी प्रामुख्याने आधुनिक काळातील सुशिक्षित व उच्चभ्रू वर्गातील (Elite Class) मधील स्त्रियांचीच मिळतात. तळागाळातील दबलेल्या स्त्रिया स्वातंत्र्योत्तर काळात लिहू लागल्या आहेत. रोजनिशीमध्ये स्त्रियांच्या वैयक्तिक जीवनाबरोबरच सभोवतालचे जग चित्रित झालेले असते. त्यातूनच त्यांचे खाजगी जीवन, भावनिक गोष्टी समजतात. या रोजनिशीतून काही वेळा प्रसंगानुरूप तर काही वेळेला पूर्ण आयुष्यातील घटना मिळू शकतात. रोजनिशी पुढील पिढ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरतात. यामुळे मागील पिढ्यांतील स्त्रियांचे अनुभव पुढील पिढीतील स्त्रियांशी तुलना करून पाहिले जाऊ शकतात. त्यामुळे स्त्रीवादी दृष्टिकोणातून चौकसपणे मत मांडणे संशोधकांना शक्य झाले आहे. रोजनिशीमधून वंश, रंग, लिंगभेद या गोष्टींची जाणीव होऊ शकते. १९ व्या व २० व्या शतकांमधील फार थोड्या स्त्रियांच्या रोजनिशी उपलब्ध होतात. यामुळे स्त्रियांच्या जीवनात डोकावणे शक्य होत आहे.

आधुनिक काळातील स्त्रियांनी शिक्षण घेतल्यानंतर स्वतःची आत्मवृत्ते, इतरांची चरित्रे, आठवणी अशा प्रकारचे लेखन प्रसिद्ध केले. अशा लिखाणातून समकालीन स्त्रियांचे कौटुंबिक जीवन, समाजातील स्थान, दर्जा, भूमिका, रूढी, परंपरा यांचे उल्लेख मिळतात. काही आत्मवृत्ते, आठवणी व चरित्रे खालीलप्रमाणे -

१. एस. पी. सेन : 'डिक्शनरी ऑफ नॅशनल बायोग्राफी' (चार खंड, कलकत्ता, १९७२)

२. डॉ. व्ही. रामकृष्णराव व डॉ. टी. रामाराव, भाषांतरकार दोन खंड, राजमहेंद्री, अडोपल्ली आणि कं. - दि ऑटोबायोग्राफी ऑफ कंदुकुरी वीरसालिंगम् पंतुलू.

३. डोंगरे राजस कृष्णराव आणि जोसेफाईन एफ. पॅटर्सन, 'पंडिता रमाबाई', मद्रास ख्रिश्चन लिटरेचर सोसायटी, १९६९.

४. पार्वती आठवले - 'माय स्टोरी - दि ऑटोबायोग्राफी ऑफ ए हिंदू विडो' भाषांतरकार, रेव्ह जस्टीन ई ॲबट, न्यूयॉर्क, जी. पी. पुटनाम, १९३०.

५. मालती रामनाथन - सिस्टर आर. सुब्बालक्ष्मी, सोशल रिफॉर्मर ॲन्ड एज्युकेशनॅलिस्ट, मुंबई, १९८९.

६. जहाँआरा शहानवाझ, फादर ॲन्ड डॉटर, ए पोलिटिकल ऑटोबायोग्राफी, लाहोर, निगारीशात, १९७१.

७. कमलाबाई एल. राव, स्मृतिका - दि स्टोरी ऑफ माय मदर ॲज टोल्ड बाय हरसेल्फ, भाषांतर - इंदिराबाई एम. राव, पुणे, डॉ. कृष्णाबाई निंबकर, १९८८.

८. मनमोहिनी झुत्शी, सहगल, ॲन इंडियन फ्रिडम फायटर रिकॉल्स हरलाईफ, संपा. जेराल्डिन फोर्ब्स, न्यूयॉर्क, एम. ई. शार्प, १९९४.

## २. वृत्तपत्रे व नियतकालिके

स्त्रीवादी इतिहासलेखनात वृत्तपत्रे व नियतकालिके यांचा वापर कितपत ग्राह्य ठरेल याविषयी अनेक उलटसुलट मते तज्ज्ञांकडून मांडली जातात. पण समकालीन संदर्भ म्हणून याचा वापर करण्यास कोणतीच हरकत नाही. पण वृत्तपत्रीय लिखाण हे बऱ्याच वेळेला एकतर्फी व अतिरंजित असते. काही वेळेला त्यामध्ये अतिशयोक्ती, खोडसाळपणा, व्यंगात्मकता असते. पण वृत्तपत्र व नियतकालिकातून बातम्या, व्यंगचित्रे, जाहिराती, वृत्तविशेष, जागतिक बातम्या, आर्थिक घडामोडी यांची माहिती मिळते. वृत्तपत्रीय लिखाण प्राथमिक संदर्भ साधनांशी पडताळून पाहिल्यास इतिहास-लेखनात वापरता येते. यामधून समाजजीवन, आर्थिक जीवन, चळवळी, व्यंक्ती व त्यांचे लिखाण यातून तत्कालीन स्त्रियांविषयी माहिती व अचूक संदर्भ मिळतात.

अशी संदर्भ साधने, स्त्रीविषयक दस्ताऐवज संग्रहात एकत्रित केलेली असतात. 'स्पॅरो' मुंबई, 'अस्मितादर्श', 'अलोचना' पुणे या ठिकाणी अशी संदर्भ साधने संग्रहित केलेली आहेत. याचप्रमाणे नियतकालिकांचे स्त्रीविषयी विशेष अंकसुद्धा बरीच माहिती पुरवितात. यामध्ये 'बायजा' सावित्रीबाई विशेष अंक याचबरोबर मराठवाडा, महाराष्ट्र टाईम्स, मानुशी, रुची, लोकराज्य, लोकमत, सत्यशोधक, इकॉनॉमिक आणि पॉलिटिकल विकली, सकाळ या वृत्तपत्रांचे व नियतकालिकांचे विशेष अंक स्त्रीविषयक संदर्भ साधने म्हणून वापरता येतात.

उदा. 'साप्ताहिक साधना', पुणे (१५ ऑगस्ट, १९७०), 'साप्ताहिक युगांतर', मुंबई (११ फेब्रुवारी, १९७१), 'स्त्री मासिक' पुणे (सप्टेंबर, १९७३), 'किर्लोस्कर मासिक' पुणे (नोव्हेंबर, १९५९), 'आवाज' (हिंदी) धनाबाद (१५ एप्रिल, १९७९) जैन महिलादर्श (हिंदी) गुडगांव हे विशेष अंक संदर्भ म्हणून उपयुक्त ठरतात.

याचप्रमाणे इंग्रजी वृत्तपत्रीय विशेष अंक यामध्ये 'द हिंदु' मिडडे, बॉम्बे क्रॉनिकल, हिंदुस्थान स्टँडर्ड कलकत्ता, 'द इंडियन एक्स्प्रेस', 'द टाईम्स इंडिया', बॉम्बे, द इंडियन नेशन, पटणा, स्टेटमन्स्, कलकत्ता यांसारखी राष्ट्रीय दर्जाची वृत्तपत्रे स्त्रीविषयक संदर्भ साधने म्हणून उपयुक्त करतात.

## अपुराभिलेखीय साधने

**मौखिक इतिहास** : मौखिक संदर्भ साधने ही दुय्यम संदर्भ साधने म्हणून ओळखली जातात. अशी साधने पाठांतरांच्या, मुलाखतीच्या व संभाषणाच्या माध्यमातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित झालेली असतात. रामायण, महाभारत, शाकुंतल यांसारखी महाकाव्ये मुखोद्गत स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित झाली. लेखन आणि छपाई कलेची प्रगती झाल्यावर सर्व भारतीय भाषांमध्ये लिहिली गेली. अशा सर्वच संदर्भ साधनांमधून तत्कालीन ऐतिहासिक प्रसंग, युद्धे, समाजजीवन, स्त्रिया, संस्कृती, चालीरीती, समकालीन रूढी व परंपरा यांचे ज्ञान मिळते. मौखिक इतिहासात पोवाडे, लोकगीते व स्त्रीगीतांचा समावेश होतो. लोकजीवनाच्या वेगवेगळ्या प्रसंगांतून अशी गीते गाण्याची प्रथा आजही टिकून आहे. पोवाड्यातून तत्कालीन स्त्रियांचे उल्लेख मिळतात. उदा. राणी लक्ष्मीबाईंचे पोवाडे.

### १. स्वातंत्र्य चळवळीतील गीते

सातारच्या प्रतिसरकार चळवळीत क्रांतिसिंह नाना पाटलांच्या भाषणापूर्वी व नंतर स्त्रियांत स्वातंत्र्य चळवळीचे विचार रुजविण्यासाठी काही ओव्या वगाने गायल्या जात.

१. गांधी माझा सखा गं, ओवी मी गाईन ।
तुरुंगात जाऊन, स्वराज्य मी मिळवीन ।
जवाहर माझा बंधू गं, ओवी त्याला गाऊया ।
उठा उठा पतिराजा हो, स्वराज्य आता मिळवू या ।

२. गांधी राज्य आले गावाला, हात लावेल कोण अबलेला ।
फाशीची शिक्षा तयाला, जिल्हा सारा आनंदून गेला ।
आशीर्वाद प्रतिसरकारला, प्रतिसरकारकी जय बोला ।

घराघरांतून रोज पहाटे जात्यावर गायल्या जाणाऱ्या या ओव्या म्हणजे सामान्य स्त्रियांचा स्वातंत्र्य चळवळीत अध्याहृत असा सहभाग होता.

### २. लोकगीते आणि स्त्रीगीते

भारतामध्ये सर्व भाषिक लोकगीतांची परंपरा प्राचीन आहे. लोक समूहाने राहू

लागले तेव्हाच लोकगीतांचे प्रचलन सुरू झाले असावे. वेद, ब्राह्मण ग्रंथ, पुराण वाङ्मय तसेच बौद्ध आणि जैन वाङ्मयातही लोकगीतांचे उल्लेख मिळतात. वेदपूर्व काळातील भारतीय संस्कृती संपन्न होती व त्या काळातही लोकगीते गायली जात असत असे मत काही अभ्यासक मांडतात. ऋग्वेदातील यज्ञविधीप्रसंगी म्हटली जाणारी सुक्ते लोकगीत परंपरेशी जवळची वाटतात. वेद वाङ्मयात संहिता, अरण्यके, उपनिषदे यातूनही पारंपरिक लोकगीतांची मुळे पाहावयास मिळतात. पुनर्जन्म, विवाह, यज्ञविधीप्रसंगी वेदकाळात जी गीते गायली जात त्यांना गाथा म्हणत. ही परंपरा प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक लोकजीवनाचे संदर्भ स्वीकारीत आजही अस्तित्वात आहेत.

वाल्मिकी रामायणात रामजन्माच्या शुभप्रसंगी गंधर्वगीते गात तर कृष्ण जन्मप्रसंगी स्त्रिया गीते गात असल्याचे उल्लेख महाकाव्ये व पुराणे यातून मिळतात. लोकगीते व स्त्रीगीते लोकजीवनाचा भाग असल्याचे अनेक उल्लेख संस्कृत वाङ्मयात आढळतात. महाकवी कालीदासाने जन्मोत्सव प्रसंगाच्या वर्णनात स्त्रियांच्या नृत्य, गायनाचे उल्लेख केले आहेत. जैन वाङ्मयातील बृहद्कल्पसूत्र ग्रंथात दळणकांडणप्रसंगी स्त्रिया ओवी गीते गात असल्याचे उल्लेख आहेत.

यादव काळातील लोकगीतांचे अनेक उल्लेख तत्कालीन वाङ्मयात येतात. महानुभाव वाङ्मयातील 'ढवळे' मौखिक स्त्रीगीतांच्या परंपरेतील एक टप्पा मानला जातो. यादव काळापासून ब्रिटिश अमलापर्यंत व आजही संस्कार विधी, धार्मिक, मनोरंजनात्मक लोकगीते जीवनाचा अविभाज्य भाग आहेत.

ह्या लोकगीतांची परंपरा जतन करून समृद्ध करण्यात भारतीय स्त्रियांचा फार मोठा वाटा आहे. स्त्रियांच्या जीवनातील सुखदुःखे भावभावना जीवनशैली, सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी जाणून घ्यावयाची असेल तर स्त्रीगीतांशिवाय अन्य साधने दुर्मीळ आहेत असे म्हणता येते. त्यामुळेच स्त्री जीवनाच्या अभ्यासात स्त्रीगीतांचे महत्त्व वाढले आहे.

स्त्रीगीतांतून स्त्रीच्या वैयक्तिक जीवनाच्या आविष्काराबरोबरच समाजजीवनाचे वेगवेगळे पैलू पुढे येतात.

"लेकीचा ग जन्म । घातला कुणा येड्यानं ।
माझे ग सखे बाई । बैल राबतो भाड्यानं ।
लेकीचा ग जन्म । जसा बाभळीचा पाला ।
धनी कोणाचा ग । कोण झाला ।"

या गीतातून मुलीचा जन्म हा भाड्याने राबणाऱ्या बैलासारखा आहे तर पुरुषप्रधान संस्कृतीत तिला असलेले गौणस्थान, तिचं नाकारलेलं अस्तित्व बाभळीच्या

पाल्याइतकेच मातिमोल आहे. या क्लेशकारक भावना स्त्री आपल्या काव्यातून व्यक्त करते आहे.

अशा अनेक स्त्रीगीतांचे समाजशास्त्रज्ञांनी व लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी वेगवेगळे वर्गीकरण केले आहे. त्यामध्ये ते धर्मविधिगीते, संस्कारविधिगीते, देव-देवताविषयक उपासना गीते, सण, उत्सवप्रसंगी गायली जाणारी स्त्रीगीते, श्रमगीते, ओवीगीते असे विविध प्रकार पाडतात. काही विशिष्ट कारण प्रसंगाने तर काही वेळेस भावना उद्रेकामुळे गायलेली ही गीते आज मौखिक परंपरेतून इतिहासाची साधने बनली आहेत.

१. **विधीगीते** : विधीविषयक गीतांमध्ये धर्मविधी, कुलाचार, संस्कार यासंबंधीची गीते समाविष्ट होतात. नवरात्रामध्ये घटस्थापना, पूजा, जोगवा, उपवास या विधीशी संबंधित गीते स्त्रिया गातात.

नवखंड पृथ्वी, आंबे तुझ ग राज्य
दैत्य वधारिला, आबाद केलं गं राज्य
आंबे, तुझ्या गं नावाने घट मांडियला ।
नव दिसाचे नव गं उपवास मला
येईन दर्शनाला, तुझ्या गं घराला
हिरवं गं लुगडं, हिरवा गं खण चोळीला ।
हिरवा गं चुडा तुला ल्याहायाला
येईन गं तुझी वटी भरायला ॥

अशा स्वरूपाच्या विधी आचरणामध्ये सुख-समृद्धी लाभावी, आरोग्य लाभावे, अशुभ निवारण व्हावे असा उद्देश असतो. यातून स्त्रिया देवीला नवस बोलतात, तिचे स्मरण करण्याची भावना व्यक्त करताना दिसतात.

२. **संस्कारगीते** : जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सोळा संस्कारांमध्ये संस्कारगीते गायली जातात. लग्नविधी, हळद लावणे या संस्कारात आई म्हणते, ''मैनेचं ग माझ्या साजरं रूप सवाशिणीनो हळद अंगा लावा खूप.''

अशा संस्कारगीतातून आईच्या लेकीविषयीच्या कोमल भावना व्यक्त होताना दिसतात.

३. **उपासनाविषयक गीते** : उपासनाविषयक गीतातून धर्म व मानवी जीवन यांतील संबंध स्पष्ट होतात.

'मारुती देव आंघोळ करी आडावरी
धोतराचा पीळा टाकियला खांद्यावरी'

या गीतातून ब्रह्मचारी मारुती स्वतःची कामे स्वतः करतो. संसारी स्त्रीला मारुती स्वतःची कामे करू देत नाही हे दिसून येते.

**४. सण आणि उत्सवप्रसंगीची स्त्रीगीते** : माहेरवाशिणी सणासाठी माहेरी येऊन सजूनधजून सामूहिक गीतातून सासर-माहेर विषयीच्या भावना मुक्तपणे व्यक्त करताना दिसतात. जिची मुलगी सणासाठी माहेरी आली नाही ती आई म्हणते,

''मैनेचं सासर सासर, जसं इकाचं कडू जहर जहर.
मैना धुणं-भांडं करी नदीवर.''

यातून आई मुलीच्या विरहाचा व तिचा सासरी होणाऱ्या छळाचे वर्णन करत आहे.

**५. नृत्य, खेळगीते** : यामध्ये सण-उत्सवाच्या निमित्ताने होणाऱ्या मनोरंजनाला महत्त्व असते. खेळताना माहेरवाशीण म्हणते,

'गरे घ्या गरे, पोटाला बरे
न खाईल त्याची म्हातारी मरे
मेली तर मेली कटकट गेली
संसाराला मोकळीक झाली.'

अशी सर्व गीते चैत्रगौर, मंगळागौर, हादगा इ. सणात गायली जात. अशी गीते गाऊन नाचताना स्त्रियांना शारीरिक व्यायामही मिळत असे. ऋतूंच्या गाण्यामध्ये पावसाची गाणी अतिशय लोकप्रिय होती. माहेरी नागपंचमी खेळून सासरी बोलवण्यास आलेल्या सासऱ्याला सून म्हणते,

'मामा तुम्ही चला हळूहळू, मी येते सुळूसुळू'

या ऋतूंच्या गाण्यांमधून ऋतू व मानवी जीवन, पर्यावरण यातील संबंध स्पष्ट केले आहेत. नागपंचमीला एक नक्षत्र संपून दुसरे नक्षत्र लागते तेव्हा म्हातारा सासरा म्हणजे पाऊस हळूहळू पुढे सरकतो आणि तारुण्याने भरलेल्या सुना सळसळत असतात, असे हे स्त्रीशी निसर्गाचे असलेले अतूट नाते या गीतातून दाखविले आहे. शेती, पाऊस, समाजजीवन, नातेसंबंध यांची हळुवार वीण अशा गीतांतून गुंफलेली दिसून येते. स्त्रीगीतातून मुलापेक्षा मुलगी चांगली व श्रेष्ठ आहे असे म्हणणारी आई होती हेही दिसते. ती म्हणते,

''जोंधळ्यापरीस वाढविते तुरी,
लेकापरीस मला लेक प्यारी.''

अशा प्रकारे आपल्या भावना, सुखदुःख व्यक्त करण्यासाठी स्त्रियांनी या गीतांचा

आधार घेतलेला दिसून येतो. म्हणूनच 'स्त्रीगीते म्हणजेच स्त्रीजीवनाची गाथा' असे म्हणणे योग्य ठरते. या गीतांचे स्वरूप पाहता समकालीन पुरुषप्रधान समाज, कुटुंब-व्यवस्था यामुळे तिचे व्यक्तिमत्त्व कुचंबलेले असते. स्त्रीगीतातून व्यक्त होणारे तिचे कल्पनाविश्व, भावविश्व आणि तिच्या जगण्याचा सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीवर केलेला अभ्यास अनेक दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. सर्व भारतीय भाषांतून व आदिवासी भाषांतूनही अशी लोकगीते प्रसिद्ध आहेत. त्यांची स्थानिक वेगवेगळी वैशिष्ट्ये आहेत. पारंपरिक जीवन जगणाऱ्या स्त्रियांचे हे अनुभव वेगळे ठरतात. स्त्रीच्या जगण्याला असणारा अर्थ आणि तिच्या वाट्याला आलेले जीवन यांचे स्पष्ट चित्र या गीतातून दिसून येते. म्हणूनच शतकानुशतके गायलेली ही गीते स्त्रीअभ्यासासाठी महत्त्वपूर्ण संदर्भ साधने ठरू शकतात.

**३. मुलाखती**

इतिहासलेखन करीत असताना अनेक संशोधकांनी आपल्या लिखाणासाठी समकालीन व्यक्तींच्या मुलाखती घेतलेल्या असतात. अशा मुलाखतीचे संदर्भ त्यांच्या लिखाणातून मिळतात. जेराल्डिन फोर्ब्स हिचे 'वुमन इन मॉडर्न इंडिया' हे पुस्तक केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेसने १९९८ मध्ये प्रसिद्ध केले. या पुस्तकाच्या लिखाणासाठी स्वातंत्र्य चळवळीच्या संदर्भातील घेतलेल्या मुलाखती तिने आपल्या पुस्तकात प्रसिद्ध केल्या आहेत. उदा. (१) लक्ष्मी स्वामीनाथ सेहगल (१९२०-२१) यांची मार्च १९७६, कानपूर (२) गोदाबाई परुळेकर - २८ फेब्रुवारी १९८०, मुंबई (३) सुमती चौधरी - २७ फेब्रुवारी, १९७६ कलकत्ता याचप्रमाणे सुचेता कृपलानी, दुर्गाबाई देशमुख यांच्याही मुलाखती त्यांनी नोंदवलेल्या आहेत. अशा अनेक मुलाखती स्त्रीविषयक लिखाणातून मिळतात.

## छायाचित्रे व चित्रे


**१. राजस्थानी भक्तिरचनेचे चित्र**

१७ व्या व १८ व्या शतकातील राजस्थानी भक्तिसंगीत रचना व पहाडी शैलीच्या चित्रांमध्ये कृष्णाची सखी म्हणजेच मुख्य गोपी असलेल्या राधेचा मध्यवर्ती व्यक्तिरेखा म्हणून पडणारा प्रभाव हळूहळू वाढीस लागला. जयदेवाच्या गीतगोविंदावर आधारित चित्रांमध्ये राधेचा चिरंतर नायकी, अनुकरणीय शिष्या, कृष्णाची प्रियतमा आणि आदर्श स्त्रीत्वाची खूण म्हणून उदय झाला. राधा ही अभिसारिका नायिका म्हणून विद्यापती किंवा चंडीदासाच्या काव्यातून रेखाटली गेली. त्यामुळे तत्कालीन चित्रशैलीत गोपीकृष्णांच्या चित्रांमध्ये कृष्णाला भेटणारी राधा दिसून येते.



राधा-कृष्ण

वसाहतवादी कालखंडात १८ व्या शतकाच्या शेवटी आणि १९ व्या शतकाच्या सुरुवातीला देवदासी आणि सती यांना एतद्देशीय प्रथा, परंपरेचे बळी मानले जाई. त्यातूनच भारतीय स्त्रिया मुख्यतः भारतीय नर्तिका आणि पौर्वात्य सौंदर्यवती यांच्या इंग्रजांनी रंगवलेल्या चित्रांमधून वसाहतवाद्यांच्या अस्तित्वाचे दर्शन होते.



**दरबारी नर्तिका**


टिल्ली-केटलने रंगवलेल्या अवधच्या दरबारी नर्तिकेच्या चित्रातून तिचे सौंदर्य, हुक्का घेऊन उभा राहण्याची पद्धती, दागदागिने, घरसजावट, वेशभूषा, धनसंपदा, विषयलोलुपता याबाबतच्या पौर्वात्य कल्पनांचे दर्शन घडते. फैजदाबाद येथील हे तैलचित्र तत्कालीन नर्तिकेचे दर्शन सहजपणे घडविते.

फ्रॉन्सीको रेनाल्डी याने हुक्का पीत असलेल्या मुस्लीम स्त्रीचे चित्र रेखाटले. हे चित्र १७८७ मधील कलकत्ता येथील तैलचित्र आहे. लाजाळू, विचारी, कामुक व उत्तान वस्त्रप्रावरणे, दागदागिने यांनी सजलेली ही स्त्री तत्कालीन सरंजामी मुस्लीम संस्कृतीचे प्रतिनिधित्व करते.



हुक्का पिणारी स्त्री

जॉन झोपानीने मिस्टर आणि मिसेस वॉरन हेस्टिंग्ज यांचे तैलचित्र कलकत्ता येथे १७८३ ते १७८७ या कालखंडात रेखाटले आहे. ब्रिटिश स्त्रीचे सौंदर्य, तिची वेशभूषा याविषयीची कल्पना सहजपणे जाणवते तर तिच्या शेजारी उभी असलेली तिची भारतीय नोकर, तिची वेशभूषा, सौंदर्य यांतील तफावत सहजपणे चित्रित केली आहे.



**मिस्टर आणि मिसेस वॉरन हेस्टिंग्ज**

त्रावणकोर संस्थांचा प्रसिद्ध चित्रकार रवी वर्मा याने १८८० ते १८९० या कालखंडात प्रेम, अभिलाषा, वियोग यांच्या रोमँटिक संकल्पना वापरून दमयंती व शकुंतला यांची सुप्रसिद्ध तैलचित्रे रंगविली. हंसाकरवी नलाला निरोप देणारी दमयंतीच्या रूपातील ही स्त्री एका प्रासादतुल्य महालात जिथे तळे व कमळ व त्यातील चबुतऱ्यावर बसलेला हंस रेखित केला आहे. या चित्रात महाराष्ट्रीय पद्धतीची नऊवारी साडी, केसांचा अंबाडा, त्यात माळलेली फुले, भरजरी साजशृंगार यातून दाक्षिणात्य सरंजामी मराठेशाही पद्धतीतील स्त्रीचे रेखाटन केले आहे.






हंस-दमयंती

नंदलाल घोष यांनी रेखाटलेले वॉटरकलरमधील सतीचे चित्र १९०७ मधील आहे. या चित्रात सती जाण्यापूर्वी रेखाटलेली स्त्री आहे. तिने जोडलेले हात, चेहऱ्यावरील भाव, दागदागिने यांचे दर्शन होते. वॉशपद्धतीने स्त्रीच्या प्रतिमेचे गुढीकरण करण्याचा प्रयत्न या चित्रातून केला आहे. या चित्रातून आत्मसमर्पण करणाऱ्या भारतीय स्त्रीचे आदर्श रूप दाखविले आहे.



सती

भारतीय सिनेमासृष्टीच्या उदयानंतर भारतीय फोटोग्राफीचा विकास झाला. त्यापूर्वी स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांचे फोटो घेण्याचा प्रकार काही प्रमाणात अस्तित्वात होता. १९६२ साली सत्यजीत रे च्या 'कांचनगंगा' या चित्रपटातील फोटोतून भारतीय स्त्रीचे बदलते रूप सहजपणे दाखवले गेले आहे. या सिनेमाची कथा दार्जिलिंगच्या पार्श्वभूमीवर चित्रित केली गेली आहे. या चित्रपटाची मध्यवर्ती नायिका मनिषा ही आपले वाग्दत्त पती श्री. बॅनर्जी यांच्याबरोबर वडिलांच्या इच्छेनुसार फिरावयास चालली आहे. तिच्या वडिलांनी तिचे लग्न परदेशी शिक्षण घेतलेल्या व उच्चपदावर काम करणाऱ्या श्री. बॅनर्जी यांच्याबरोबर ठरवले आहे. या फोटोवरून तिचा मेकअप, अत्याधुनिक वेशभूषा, केशभूषा यांचे चित्रण झाले आहे तर आपल्या नवऱ्याला हव्या असणाऱ्या आधुनिक ब्रिटिश स्त्रीच्या वेशभूषेत ती प्रचंड दबावाखाली दिसत आहे. तिचे मौन आपल्या आधुनिक पतीचे काहीतरी सांगणे, समजावणे हे या फोटोचे वैशिष्ट्य आहे.



**कांचनगंगा**

## जनगणना

मानवी लोकसंख्याशास्त्र ही विद्याशाखा दोन नावाने ओळखली जाते. (१) लोकसंख्या अभ्यास (२) लोकसंख्याशास्त्र (Demography - Demo = लोक) या शास्त्रामध्ये लोकांच्या संख्यात्मक अभ्यासाबरोबरच त्यांच्या सांस्कृतिक व इतर वैशिष्ट्यांच्या अभ्यासाचाही समावेश होतो. वॉरन एस. थॉमसनच्या मते,

''लोकसंख्येच्या आकारमानात कोणत्या प्रकारचे बदल घडून येतात, ते कशा प्रकारे घडून येतात आणि मानवी कल्याणाच्या दृष्टीने या बदलांचे महत्त्व यामध्ये कोणत्या प्रकारचे लोक आढळून येतात व एका गटातील लोक दुसऱ्या गटातील लोकांहून कसे भिन्न असतात'' याचा अभ्यास जनगणनेत केला जातो.

प्राचीन भारतीय इतिहासात कौटिल्याच्या अर्थशास्त्रात तर अबुल फजलच्या ऐन-ए-अकबरीमध्ये काही लोकसंख्याविषयक संदर्भ आढळतात. वसाहत काळात किंग्जले डेव्हिस या लोकसंख्या शास्त्रज्ञाने १८७१-१९४१ या कालखंडात भारतीय जनगणना अहवाल तयार केले. त्याचप्रमाणे १८८२, १९०७, १९०९ मध्ये 'इंपीरियल गॅझेटियरस्' प्रसिद्ध करण्यात आले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात १९५१ ते २००१ या कालखंडात प्रत्येक दहा वर्षांनी एक असे सहा जनगणना अहवाल आजपर्यंत प्रसिद्ध केले गेले आहेत. या अहवालांसाठी लागणारी माहिती प्रत्येक गावातून झालेली शिरगणती, जन्म-मृत्यू, विवाह आणि घटस्फोट यांसारख्या विश्वासार्ह माहितीतून संकलित केली जाते. यामध्ये लोकसंख्याविषयक अहवालात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक माहितीचे संकलन, मूल्यमापन, विश्लेषण व प्रसिद्धीकरण यांचा समावेश होतो.

जनगणना अभ्यासाचे लिंगभेद हे सहजपणे ओळखता येणारे गुणवैशिष्ट्य आहे. यामुळे भारतातील एकूण लोकसंख्येत पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण, साक्षरता, शिक्षण ग्रामीण, शहरी भागात राहणाऱ्या स्त्रिया यांची आकडेवारी उपलब्ध होऊ शकते. तसेच तुलनात्मकदृष्ट्या कोणत्या राज्यात स्त्रियांचे प्रमाण सर्वांत जास्त किंवा कमी आहे, तसेच साक्षरता, शिक्षण, भ्रूणहत्या, एड्स, वेश्या, काम करणाऱ्या स्त्रिया यांची आकडेवारी मिळविता येते.

स्त्रीअभ्यासामध्ये जनगणनेतून मिळणाऱ्या स्त्रीविषयक संख्येचे महत्त्व वाढू लागले आहे. त्यामुळे शहरात व खेड्यात राहणाऱ्या स्त्रियांची संख्या, विभिन्न राज्यांमध्ये स्त्री-लोकसंख्या वाढीचे प्रमाण याचा आढावा घेता येतो. उदा. १९७१-८१, १९८१-९१, १९९१-२००१ या जनगणना अहवालांच्या अभ्यासातून हे लक्षात येते की, स्त्री लोकसंख्यावाढीचे प्रमाण सर्वाधिक नागालँडमध्ये (४९.३६, ५८.२८, ६६.६४ क्रमशः) १९७१-८१ व १९८१-९१ मध्ये सर्वांत कमी स्त्रियांची संख्या तमिळनाडू (१७.४२, १५.२२ क्रमशः) मध्ये होती. तर १९९१-२००१ ला मध्य प्रदेशात सर्वांत कमी (९.३६) ही एक काळजीची बाब होती. तसेच जन्म व मृत्यूचे प्रमाण कसे होते हेही कळते. १९७१-९१ मध्ये १५ ते ४९ वयोगटातील स्त्रियांमध्ये मुलींच्या जन्माचे प्रमाण २४.६९ व २३.४० क्रमशः होते. ही संख्या शहरांपेक्षा खेड्यात वाढली.

मृत्युदराच्या प्रमाणात १९७१ पेक्षा १९९१ मध्ये वैद्यकीय सोई वाढल्याने घट झाली. शहरांपेक्षा खेड्यांत मृत्युदराचे प्रमाण जास्त असे. खेड्यात व शहरात पुरुषांच्या प्रमाणात किती स्त्रिया कामाला आहेत; १९७१ पर्यंत असे दिसते की, स्त्रियांचा सहभाग कमी आहे. यानंतर त्यांच्या संख्येत थोडीशी वाढ झाली. १९७१ मध्ये शहरात ७.१८, खेड्यात २५.९२ तर २००१ मध्ये खेड्यात ३०.९८ व शहरात ११.५५ स्त्रिया काम करीत होत्या. शिवाय वेगवेगळ्या व्यवसायांत काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण किती आहे. १९७१ मध्ये ग्रामीण भागात पुरुष व स्त्रियांचे बेकारीचे प्रमाण अनुक्रमे ३२ व ४५ लाख होते. १९७० मध्ये व्यावसायिक, तांत्रिक व अन्य संबंधित व्यवसाय करणाऱ्यांपैकी केवळ १७ टक्के स्त्रिया होत्या. त्यामध्ये ३/४ स्त्रिया शिक्षिका होत्या. एकूण शिक्षिकांपैकी ७१ टक्के प्राथमिक शाळांत व २९ टक्के उच्च माध्यमिक शाळेत शिक्षिका होत्या.

जनगणना अहवालामध्ये प्रजननता हा एक स्वतंत्र विभाग असतो. जननक्षम दांपत्याला होणाऱ्या मुलांच्या संख्येवर त्या दांपत्याच्या शैक्षणिक पातळीचा मोठा प्रभाव पडतो. स्त्रियांची शैक्षणिक पातळी हे आधुनिकीकरण व स्त्रियांचे कुटुंबातील व सामाजिक स्थान याचे निदर्शक आहे. शैक्षणिक पातळी जेवढी उंच असते तेवढा कुटुंबाचा आकार कमी असतो. त्याचप्रमाणे आर्थिक स्थिती, प्रजननता, पतीचा व्यवसाय व प्रजननता हे दोन्ही परस्परांवर अवलंबून आहेत. पत्नीची नोकरी, धर्म, जात, वंश इत्यादी घटकदेखील प्रजननतेवर परिणाम करतात.

आज प्रत्येक राज्यातील स्त्रियांचे प्रमाण कसे व का घटत चालले आहे. यामागची कारणे जनगणनाविषयक आकड्यातून अभ्यासता येतात. पुरुषांच्या प्रमाणात स्त्रियांच्या लोकसंख्या वाढीचे प्रमाण घटत चालले आहे. याचे कारण म्हणजे मुलाच्या हव्यासापायी होणारी गर्भलिंग चिकित्सा व मुलीच्या गर्भाची भ्रूणहत्या ही आहे. यामध्ये पैशाच्या हव्यासापायी उच्चशिक्षित स्त्रीरोगतज्ज्ञ डॉक्टरांचाही सहभाग आहे. त्यामुळेच गर्भजल परीक्षणावर सरकारने कायदेशीर निर्बंध आणून त्यासाठी कठोर शिक्षा सुनावल्या आहेत तर स्त्रियांच्या स्वयंसेवी संस्था अशा प्रकारच्या अनैतिक व्यवसायांवर लक्ष ठेवून अशी प्रकरणे शोधण्यास सरकारला साहाय्य करू लागल्या आहेत. थोडक्यात, स्त्रियांचे वाढीचे, कमी होण्याचे, साक्षरतेचे, जन्म-मृत्युदराचे प्रमाण कळणे, याबरोबरच वाईट चालीरीती, विधवा, घटस्फोटित स्त्रिया, भ्रूणहत्या यांचाही अभ्यास जनगणना अहवालामुळे करता येणे सहज शक्य झाले आहे.

✦✦✦